# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.02.2026** **वारः बुधवार**

---

1. पंतप्रधान मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्या दरम्यान मुंबईत चर्चा; द्विपक्षीय भागीदारीसंदर्भातील 21 सामंजस्य करारांवर स्वाक्षरी
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीत एआय परिषदेदरम्यान विविध जागतिक नेत्यांशी संवाद साधणार
3. एआय इम्पॅक्ट परिषदेच्या तिसऱ्या दिवशी आज संशोधन परिसंवादाचं आयोजन आणि
4. एसीसी महिला आशिया करंडक रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेत भारताचा नेपाळवर सात गडी राखून दणदणीत विजय

**भारत फ्रान्स**

भारत आणि फ्रान्स यांनी उभय देशांतील संबंध उंचीवर नेत, विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारीमध्ये रूपांतरित करण्यास काल सहमती दर्शवली. या संदर्भात उभय देशांनी 21 सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. प्रगत भागीदारी आणि होरायझन 2047 पर्थदर्शी आराखड्याच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेण्यासाठी परराष्ट्र मंत्र्यांचा संवाद स्थापन करण्यासाठीही, दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली. उभय राष्ट्रांदरम्यान भारत फ्रान्स इनोव्हेशन इयर आणि भारत-फ्रान्स इनोव्हेशन नेटवर्क सुरू करण्यासही मंजुरी दर्शवली आहे. मोदी आणि मॅक्राँ यांच्यात काल मुंबईत द्विपक्षीय चर्चा झाली. मुंबईत लोकभवन इथं फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्यासमवेत संयुक्त निवेदन जारी करताना, पंतप्रधानांनी ही भागीदारी केवळ धोरणात्मक नसून आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत जागतिक स्थिरता आणि समृद्धीसाठी महत्त्वाची आहे. उभय देशांतील संबंध विशेष असून फ्रान्स भारताच्या सर्वांत जुन्या धोरणात्मक भागीदारांपैकी एक असल्याचं मोदींनी नमूद केलं. ही धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं. ही चर्चा विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार असल्याचंही ते म्हणाले. दोन्ही देशातले नागरिक आणि कंपन्यांना दुहेरी कर द्यावा लागू नये यासाठी करार करण्याचा निर्णय भारत आणि फ्रान्सनं घेतला असल्याचं त्यांनी सांगितलं. दोन्ही नेत्यांनी यावेळी कर्नाटकातल्या हेलिकॉप्टर कारखान्याचं उद्घाटन केलं. भारत–फ्रान्स सहकार्य अधिक दृढ होत असून परस्पर विश्वास, खुलेपणा आणि महत्त्वाकांक्षा या आधारावर ही भागीदारी पुढे जात असल्याचं अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी सांगितलं.

**जी-7**

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फ्रान्समध्ये होणाऱ्या यंदाच्या जी सात देशांच्या 52 व्या शिखर परिषदेसाठी आमंत्रित केलं आहे. मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत मॅक्राँ यांनी एव्हियन इथं होणाऱ्या शिखर परिषदेपूर्वी आंतरराष्ट्रीय धोरण करार करण्यासाठी भारत आणि फ्रान्स दरम्यान बैठकीचे आयोजन करण्याचे आवाहन केले. यंदाच्या ब्रिक्स शिखर परिषदेचे अध्यक्षस्थान भारत भूषवणार आहे. फ्रान्स जी सात गटाचा अध्यक्ष असून, दोन्ही देशांतील युवकांसाठी हा नाविन्यपूर्ण काळ आहे, असे मॅक्राँ यांनी नमूद केले.

**पंतप्रधान-द्विपक्षीय**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्लीत, एआय परिषदेदरम्यान विविध जागतिक नेत्यांशी संवाद साधणार आहेत. या बैठकांमध्ये स्पेन, फिनलंड, सर्बिया, क्रोएशिया, एस्टोनिया, भूतान आणि कझाकस्तान या देशांच्या समपदस्थांशी ते संवाद साधणार आहेत. दरम्यान, श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांचं काल दिल्लीत आगमन झालं आहे, ते आज एआय परिषदेत सहभागी होणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्री रणधीर जयस्वाल यांनी दिसानायके यांच्या भेटीमुळे भारत-श्रीलंका भागीदारीला प्रोत्साहन मिळणार असल्याचं समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>एआय तिसरा दिवस</u>**

दिल्लीत सुरू असलेल्या एआय इम्पॅक्ट परिषद 2026 च्या तिसऱ्या दिवशी आज संशोधन परिसंवादाचं आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये एस्टोनियाचे राष्ट्राध्यक्ष अलार कारिस, माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री जितीन प्रसाद यांच्यासह इतर मान्यवर सहभागी होणार आहेत. या व्यतिरिक्त,कार्य गटाचे उद्घाटन आणि शुभारंभही होणार आहे. या परिसंवादात, इंडिया एआय इम्पॅक्ट परिषदेचा व्यापक दृष्टीकोन, प्राधान्यक्रम आणि विषयपत्रिकेवर चर्चा करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त, शाश्वत विकास लक्ष्याच्या पलीकडे जात, जागतिक विकासाला एआय कसा आकार देईल, या नियोजित सत्रात एआयमुळे उत्पादकतेला कसे प्रोत्साहन मिळेल, क्षमता बळकटीकरण, विकासाचे मार्ग खुले करणे, जागतिक स्तरावर समानतेने असमानतेत घट करणे या विषयी विस्तृत चर्चा होणार आहे.

**<u>जितेंद्र सिंह</u>**

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता हा पर्याय राहिलेला नसून तो आवश्यक घटक झाल्याचे विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री ड़ॉ. जितेंद्र सिह यांनी म्हटलं आहे. ते काल एआय इम्पॅक्ट समिट 2026 मध्ये आयोजित भारतजेन मॉडेल्सः व्हिजन अँड टेक्निकल एक्झिक्युशन या विषयावरील सत्राला संबोधित करताना बोलत होते. भारतजेन या देशातल्या पहिल्या सरकारी मालकीच्या सर्वांत मोठ्या भाषा आराखडा उपक्रमाचे कौतुक करताना, तांत्रिक स्वावलंबानाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलल्याचे म्हटलं आहे. 22 अनुसुचित भाषांसाठीही हा विस्तार करण्याची गरज अधोरेखित करताना, कृत्रिम बुद्धिमत्ता व्यवस्थेमार्फत भारताची प्रत्यक्षातील भाषिक विविधता, विशेषतः प्रशासन आणि सार्वजनिक सेवा वितरणात प्रतिबिंबित झाली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<u>राष्ट्रपती-आंध्रप्रदेश</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम् इथं होणाऱ्या नौदलाच्या चालू वर्षाच्या आंतरराष्ट्रीय नौदल संचलनामध्ये सहभागी होतील. सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर म्हणून राष्ट्रपती संचलनाच्या साक्षीदार होणार आहेत. यामध्ये भारतीय नौदलाची सामर्थ्य आणि समुद्री क्षमतेचे प्रदर्शन करण्यात येणार आहे.

**<u>जयशंकर</u>**

अलिकडच्या काळात भारताचे विविध देशांशी झालेले करार हे देशाच्या आर्थिक प्रगतीमुळे वाढलेल्या आत्मविश्वासाचं द्योतक आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईत आयोजित जागतिक आर्थिक सहकार्य परिषदेला त्यांनी काल संबोधित केलं. देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचं 14 ते 15 टक्के योगदान असून परकीय गुंतवणुकीतही महाराष्ट्र आघाडीवर आहे, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

**<u>अमित शहा-पश्चिम बंगाल</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पश्चिम बंगालच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. कोलकता इथं भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूर यांच्या 152 व्या जयंती उत्सवात नादियाच्या मायापूर इथल्या इस्कॉनच्या मुख्यालयात सहभागी होतील. त्या व्यतिरिक्त, जयपताका स्वामी महाराज यांच्या समवेत शहा उच्चस्तरीय बैठक घेणार आहेत तसेच मंदिर परिसरात जनमेळाव्याला संबोधित करणार आहेत.

**<u>अमित शहा-आसाम</u>**

केंद्रीय गृहमंत्री शनिवारी आसाममध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल म्हणजेच सीआरपीएफ 87 व्या वर्धापन दिनाच्या संचलनाला उपस्थित राहाणार आहेत. यामध्ये महासंचालकांच्या संचलनाचेही आयोजन केले जाणार आहे. यंदा पहिल्यांदाच सीआरपीएफचा वर्धापन दिन ईशान्येकडील राज्यांत साजरा केला जात आहे.

**<u>केरळ-न्यायालय</u>**

केरळ उच्च न्यायालयानं राज्याच्या नवा 'केरळ नागरिक प्रतिसाद' या सर्वेक्षण कार्यक्रमाविरुद्ध जनहित याचिका दाखल करण्यास परवानगी दिली असून सरकारी आदेश रद्द केला आहे. केएसयूचे राज्य अध्यक्ष अलॉयसियस झेवियर आणि पेरुम्बवूर इथले रहिवासी एम एच मुबास यांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी करताना मुख्य न्यायाधीश सौमेन सेन आणि न्यायमूर्ती व्ही. एम.

श्याम कुमार यांच्या खंडपीठानं हा निर्णय दिला.या निर्णयामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची प्रक्रिया थांबणार आहे. हे सर्वेक्षण म्हणजे राज्य निधीतून राबविण्यात येणारी राजकीय मोहीम आहे अशी टीका टीकाकारांनी केली होती.

**बांगलादेश**

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारिक रहमान यांनी काल बांगलादेशच्या पंतप्रधान पदाची शपथ घेतली, यामुळे मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम प्रशासनात सुमारे 18 महिन्यांच्या अनिश्चिततेनंतर एक नवीन राजकीय अध्याय सुरू झाला आहे.

**पंतप्रधान-रहमान**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांग्लादेशच्या नवनिर्वाचित तारिक रहमान यांचं विजयाबद्दल पत्र लिहून अभिनंदन केलं असून, त्यांना सहकुटुंब भारतभेटीचं आमंत्रण दिलं आहे. उभय देशांतील बहुआयामी द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी एकत्रित काम करण्यास उत्सुक असल्याचं मोदी यांनी रहमान यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केलं आहे.

**क्रिकेट-टी-20**

पुरुषांच्या टी-20 विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत,काल रात्री मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या क गटाच्या सामन्यात नेपाळनं स्कॉटलंडचा सात गडी राखून पराभव केला. स्कॉटलंडनं दिलेल्या 171 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळने शेवटच्या षटकांत 3 बाद 171 धावा केल्या. नेपाळकडून दीपेंद्र सिंग ऐरी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं.

तत्पूर्वी, काल दुपारी चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर झालेल्या ड गटाच्या सामन्यात न्यूझीलंडनं कॅनडाचा आठ गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाचा संघ या स्पर्धेतून बाहेर पडला आहे. या स्पर्धेत आज तीन सामने होणार आहेत. दिल्लीत सकाळी 11 वाजता ड गटात, दक्षिण आफ्रिकेचा सामना संयुक्त अरब अमिरातीशी होईल. तर 'अ' गटात पाकिस्तान आणि नामिबियादरम्यान कोलंबोत दुपारी 3 वाजता सामना होईल. तर तिसरा सामना, अहमदाबाद इथं संध्याकाळी 7 वाजता 'अ' गटात भारत आणि नेदरलँड्स यांच्यात होणार आहे.

**क्रिकेट**

एसीसी महिला आशिया करंडक रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेच्या अ गटाच्या सामन्यात भारतानं काल नेपाळवर सात गडी राखून दणदणीत विजय मिळवला आणि उपांत्य फेरीत स्थान निश्चित केलं. या विजयासह भारतानं अ गटामध्ये तीन सामन्यांमधील दुसरा विजय नोंदवला. भारतानं, दोन विजय आणि एक पराभवासह चार गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावलं आहे. तनुजा कंवरला तिच्या उत्कृष्ट गोलंदाजी कामगिरीसाठी सामनावीर म्हणून गौरविण्यात आलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.